MHPA140015062025

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१५९/२०२५
सुरेश सटवाजी ढगे व इतर
विरुध्द
निरंक

## निशाणी क्र.०१ खालील आदेश

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज, मुंबई विनियमन (Regulation) अधिनियम कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांचे अर्जातील कथन असे आहे की, मयत नामे यशोदाबाई सटवाजी ढगे ह्या दिनांक ०४/०८/२०११ रोजी आंबेडकर नगर, पुर्णा, ता.पुर्णा, जि. परभणी येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार सुरेश सटवाजी ढगे हा मयताचा मुलगा, इतर नातेवाईक क्र.१ दुर्गाबाई प्रकाश लोखंडे, इतर नातेवाईक क्र.२ महानंदा उर्फ नंदा सटवाजी ढगे ह्या मयताच्या मुली, इतर नातेवाईक क्र.३ सुमनबाई रमेश ढगे ही मयताची सुन, इतर नातेवाईक क्र.४ सिद्योधन रमेश ढगे, इतर नातेवाईक क्र.५ संदीप रमेश ढगे हे मयताचे नातु, इतर नातेवाईक क्र.६ सिमा विजय दुधडे व इतर नातेवाईक क्र.७ सुषमा विजयकुमार धोंगडे ह्या मयताच्या नात आहेत. मयताच्या पश्चात अर्जदार व इतर नातेवाईक हे मयताचे कायदेशीर वारस असून त्यांच्याशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार व इतर नातेवाईकांना मयताचे कायदेशीर वारस म्हणून ओळखण्यासाठी त्यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज मंजूर करुन वारस प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात देण्याची विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत प्रकरणी, अर्जदाराच्या मागणी विषयी या न्यायालयाच्या बेलीफ मार्फत जाहीर प्रगटण सार्वजनीक ठिकाणी सुचना फलकावर लावण्यात आले त्याबाबतचा बेलीफ अहवाल (निशाणी ०६) प्रमाणे असून 'दैनीक देशोन्नती' या वर्तमानपत्रामध्ये दिनांक २६/११/२०२५ रोजी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. निशाणी क्र.०९ वर अर्जदाराच्या सरतपासणीच्या शपथपत्राच्या पडताळणीवेळी मयत रमेश सटवाजी ढगे याला दोन मुले व दोन मुली असल्याचे कथन केले होते. त्यानुसार आवश्यक त्या पूर्ततेकामी प्रकरण ठेवण्यात आले. दरम्यानच्या काळात इतर नातेवाईक क्र.०३ ते ०७ यांनी आक्षेप अर्ज (निशाणी १०) सादर केला. त्यानुसार अर्जदाराने निशाणी १५ वर त्याचे म्हणणे सादर करुन आक्षेपकांना अर्जात अर्जदार म्हणून समाविष्ट करण्यास त्याची हरकत नसल्याचे कथन केले. त्याप्रमाणे अर्जदाराने दुरुस्ती अर्ज (निशाणी १६) सादर केला. त्यावरील आदेशानुसार अर्जदाराने अर्जात दुरुस्ती करुन दुरुस्ती अर्ज सादर केला. त्यानंतर

पुन्हा 'दैनीक देशोन्नती' या वर्तमानपत्रामध्ये दिनांक ०५/०३/२०२६ रोजी जाहीर प्रगटन (निशाणी २८) प्रसिध्द करण्यात येवुन अर्जदाराच्या मागणी बाबत कुणाला हरकत, आक्षेप असल्यास त्यांनी न्यायालयासमक्ष हजर होऊन नोंदवावा असे कळविण्यात आले. परंतु, सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द होऊनही अद्याप पावेतो कोणीही या अर्जास हरकत, आक्षेप नोंदविलेला नाही.

**०४.** अर्जदार यांनी अर्जातील कथनाच्या समर्थनार्थ निशाणी क्र.२७ वर शपथपत्र दाखल केले. तसेच, नि.क्र.२९ व ३१ वर मयत यशोदाबाई ढगे व सटवाजी ढगे यांच्या मृत्यु प्रमाणपत्राच्या प्रती व नि.क्र.३०, ३२ वर मयत यशोदाबाई व सटवाजी ढगे यांच्या आधार ओळखपत्राच्या पडताळणी केलेल्या प्रती, निशाणी ३३ व ३४ वर इतर नातेवाईक क्र.१ व २ यांच्या आधार ओळखपत्राच्या पडताळणी केलेल्या प्रती दाखल करून पुरावा बंद केल्याची पुरसीस नि.क्र.३५ दाखल केली आहे.

**०५.** अर्जदारांच्या वतीने श्री.एस.एस.काळे, वकील यांनी युक्तीवाद केला की मयत यशोदाबाई सटवाजी ढगे यांना अर्जदार व इतर नातेवाईकांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अभिलेखावरील कागदपत्रांचे सूक्ष्मपणे अवलोकन केले.

**०६.** अर्जदाराचा अर्ज, अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेला कागदोपत्री पुरावा आणि त्याचे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ येतात व त्यापुढील निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या करणांकरिता मांडत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**०७.** अर्जदाराला वारसाप्रमाणपत्राच्या आधारे मयताची मिळकत त्यांच्या हक्कात किंवा नावाने करून घेण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. वारस प्रमाणपत्र मयाताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करण्यासाठी उपयोगात घेता येते. माननीय मुंबई उच्च न्यायालयांने ***ॲलायसीस मॅनुअल डिसुझा व इतर विरूध्द मॅरी कमला विल्यम मॅनुअल डिसूझा, २००६ (मुंबई) सी.आर. ५६*** मध्ये

मांडलेले निरीक्षण असे आहे की, वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जात न्यायालयाला मयताच्या मिळकतीवरील वारसांचा अधिकार ठरविण्याची गरज नसुन फक्त अर्जदार हे मयताचे वारस असल्याबाबत घोषीत करावे. अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र वितरीत केले म्हणजे मयताच्या मिळकतीवर वारसांचा हक्क निर्माण होतो असा अर्थ होत नाही किंवा मयताच्या मिळकतीमध्ये एखाद्याचा अधिकार हिराऊन घेतल्या जात नाही.

०८. तसेच, माननीय उच्च न्यायालय मुंबई यांनी ***गणपती विनायक आचवल, २०१४(६), एमएच.एल.जे. ६८३*** मध्ये नोंदविलेले निरीक्षण असे की, वारस प्रमाणपत्र दिले म्हणजे अर्जदारांना मयताचे सर्वाधिकार प्राप्त होत नाहीत. वारस प्रमाणपत्र मंजुर झाले म्हणजे अर्जदार हे मयताचे केवळ प्रतिनिधीक वारस असल्याचे घोषीत होते. वारस प्रमाणपत्र मंजुरी हे केवळ वारसांची विद्यमान स्थिती असल्याचे औपचारीक घोषणा असते किंवा मृत्युपत्राचा व्यवस्थापक किंवा कायदेशीर प्रशासक हे न्यायालयाच्या आदेशा शिवाय मयताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करू शकतात.

०९. असे असतांना एखादा व्यक्ती मुंबई विनियमन अधिनियम–VIII च्या नियमानुसार एखादा व्यक्ती पुढील परिस्थीतीमध्ये वारसाप्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे–१.जर त्याची वारस प्रमाणपत्र मिळण्याची इच्छा असेल तर, २.जर वारस म्हणुन त्याच्या अधिकाराबाबत काही वाद असेल तर किंवा मयताच्या नावे असलेली मिळकत ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीला विश्वासात घेवुन मयताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करावयाचे असल्यास वारस प्रमाणपत्राची मागणी करू शकतो. सदरील प्रकरणामध्ये अर्जदारांनी वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

१०. अर्जदार क्र.१ ने शपथपत्राद्वारे दिलेला पुरावा व दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्या वरुन, अर्जदार व इतर नातेवाईक क्र.१ ते ७ हे मयताचे वारस असल्याचे सिध्द होते. तसेच, अर्जदार व इतर नातेवाईक हे मयताचे वारस असल्याबद्दल प्रकरणात कोणाचाही आक्षेप आला नाही. त्यामुळे, अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे अर्जदार व इतर नातेवाईक मयताच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदार व इतर नातेवाईक क्र.१ ते ७ हे मयत यशोदाबाई सटवाजी ढगे यांचे कायदेशीर वारस आहेत असे नाममात्र घोषित करण्यात येते.

०३. मुंबई विनियमन (Regulation) अधिनियम कलम २ व ८ प्रमाणे अर्जदाराकडून विहीत न्यायालयीन शुल्क घेवून वारसा हक्क प्रमाणपत्र देण्यात यावे.

दिनांकः १५/०७/२०२६

**(विशाल आर. गटकळ)**
सह. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
पुर्णा, जि. परभणी.